# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन; मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे – ४०१ १०१


वाचा :- १) प.क्र.मनपा/लेखा/२५०/२०१४-१५ दि.०४/०२/२०१५
२) स्मरणपत्र क्र.०१ मिभामनपा/लेखा/१९९ दि.२५/०८/२०१५

जा.क्र.मनपा/आयुक्त/१६१ /२०१७-१८ दि.२६/०३ /२०१८.

संगणक विभाग
आवक २०१८
दिनांक २७/३/२०१८

## // कार्यालयीन आदेश //

आपणांस या आदेशाद्वारे कळविण्यांत येत आहे की, आपले विभागाची प्रदानासाठी देयके लेखा विभागास सादर करताना ती दुय्यम प्रतीत सादर करण्यांत यावीत. ज्या ज्या देयकांचे प्रदान होईल अशा देयकांचे दुय्यम प्रतीवर प्रदानाचा तपशिल व रोखपाल अथवा लेखाशाखेने नेमलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची स्वाक्षरी घेवून अशा दुय्यम प्रत आपले दप्तरी संग्रहीत करुन ठेवावी. शासनाच्या/महालेखापाल यांच्या लेखापरिक्षण पथकाने मुळ देयकांची लेखापरिक्षणासाठी मागणी केल्यास ती त्यांना उपलब्ध करुन देऊन लेखा आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच माहिती अधिकारात आपले विभागाची माहिती अर्जदाराने अपेक्षिली असल्यास आपले विभागानेच ती माहिती पुरविली पाहिजे. आमचे असे निदर्शनास आलेले आहे की, आपले विभागाशी संबंधित माहिती लेखा शाखेकडून प्राप्त करुन घ्यावी असे अर्ज़दारास कळविण्यांत येत असते. यापुढे अशा प्रकारे अर्जदारांची माहिती आपआपल्या विभागाने पुरविण्याची दक्षता घ्यावी. सदरचा आदेश प्राप्त होताच आपलेकडून झालेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडेच सादर करावा.

(बी.जी.पवार (भा.प्र.से)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रति,
श्री/श्रीम. संगणक विभाग,
मिभामनपा,

प्रत माहितीसाठी
१) अति. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका
२) सर्व उपायुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका
३) मुख्यलेखापरिक्षक, मिरा-भाईंदर महानगरपालिका
४) मुख्यलेखाधिकारी, मिरा-भाईंदर महानगरपालिका
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका
६) कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका